विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादर कर्ता अधिकारी यांची नेमणुक करणे बाबत. (श्री.नेताजी शिवाजी भाबड सेवा निलंबीत पंचायत अधिकारी ग्रामपंचायत वाघा तालुका जामखेड)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश- ग्रामपंचायत विभाग/ग्रांप३/१४८७
दिनांक२० / ०८ /२०२५

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रांप-३/२२८ /२०२४ दिनांक- २१ /५ /२०२४ पोहच २५/०७/२०२४
२. श्री.नेताजी शिवाजी भाबडे सेवा निलंबित ग्रामपंचायत यांचा खुलासा दिनांक- ०२ /०८/२०२४
३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)

ज्या अर्थी श्री.नेताजी शिवाजी भाबड ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत वाघा तालुका जामखेड यांचे गैरवर्तन विरुध्द संदर्भ क्र.१ अन्वये सेवानिलंबीत करण्यात आलेले असुन संदर्भ क्रमांक ०२ अन्वये गैरतर्वनाचे दोषारोप तयार करुन दोषारोपांचे ज्ञापन देण्यात आलेले आहे .

संदर्भ क्रमांक २ नुसार श्री.नेताजी शिवाजी भाबड यांनी दोषारोपांचा खुलासा सादर केलेला असुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप क्र.०१ व ०२ अमान्य केलेले आहेत. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहिल्याननगर यांनी श्री.भाबड यांचे विरोधात मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्याची परवानगी दिनांक २५/०३/२०२५ रोजी जिल्हा परिषदेकडे मागीतलेली आहे. त्यांची या बाबतची चौकशी पुर्ण झालेली आहे. सबब त्यांचे विरुध्द जिल्हा परिषदे मार्फत न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६(३) च्या तरतुदींनुसार संदर्भ क्र.३ अन्वये या प्रकरणी चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर उक्त नियमांच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री.नेताजी शिवाजी भाबड सेवा निलंबित पंचायत अधिकारी ग्रामपंचायत वाघा तालुका जामखेड यांचेवर ठेवण्यात आलेल्या उक्त दोषारोपाच्या संदर्भात विभागीय चौकशी करण्याचे आदेश देत आहे.सदरची विभागीय चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणून सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. व जिल्हा परिषदेच्या वतीने बाजू मांडणे कामी सादरकर्ता अधिकारी म्हणून श्री.गाडे अशोक बबन कक्ष अधिकारी पंचायत समिती जामखेड यांची नियुक्ती करीत आहे. सदर विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील. प्रकरणी नियुक्त केलेल्या चौकशी अधिकारी यांनी संदर्भ क्र.३ मधील सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहून चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202508200800 80 असा आहे.

आनंद भंडारी (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

सहा. आयुक्त, (चौकशी) विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग, नाशिक

२/- सोबत श्री.नेताजी शिवाजी भाबड यांचे गैरवर्तनाबाबतचे पुरावे समवेत जोडले आहे. प्रकरणी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत :- श्री.नेताजी शिवाजी भाबड पंचायत. अधिकारी पंचायत समिती जामखेड मुख्यालय कोपरगाव

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव

२/- सोबतचा आदेशश्री.नेताजी शिवाजी भाबड पंचायत अधिकारी यांना बजावून तो मिळालेबाबतची पोहोच या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- श्री.गाडे अशोक बबन कक्ष अधिकारी पंचायत समिती जामखेड

प्रत :- निवड नस्ती.

( स्वाक्षरीत /-)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर